# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

**Dr.I.S. Mohurley**
**Director**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** director.studentwelfaregug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSW/127/2015** **Dt:16/09/2015**

प्रति,

१) मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
२) मा. विभागप्रमूख,
पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय: 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यक्रम राबविणेबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या देशात भूकंप, दुष्काळ, अवर्षण, दंगल, चक्रीवादळे, औद्योगिक अपघात, त्सुनामी लाटा, आग या आपत्तींची वारंवारता वाढली आहे. यासाठी जनजागृती करण्याचे काम आवश्यक आहे. हा विचार करून या वर्षीपासून 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यक्रम विद्यापीठाने सुरू केलेला आहे. या बद्दलची सविस्तर माहीती व प्रपत्र विद्यापीठाच्या www.unigug.org आणि www.gondwana.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. दि. १७ जुलै २०१५ रोजी विद्यार्थी कल्याणार्थ योजनांवर कार्यशाळा घेण्यात आली. प्रत्येक महाविद्यालयाला मार्गदर्शक पुस्तिका देण्यात आली व विविध योजनांकरिता प्रस्ताव पाठवावेत असे आवाहनही करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रथम वर्ष असल्यामुळे विविध महाविद्यालयांकडून सदरहु प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी प्रस्ताव अपेक्षित आहेत. करिता आपणास आपल्या महाविद्यालयामध्ये सदरहु कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने दि. ३०सप्टेंबर २०१५ पर्यंत संचालक विद्यार्थी कल्याण गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कार्यालयास प्रस्ताव सादर करावा, हि विनंती.

धन्यवाद!

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
संचालक विद्यार्थी कल्याण
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सहपत्रे:— वरीलप्रमाणे**

**प्रत माहितीस्तव :—**

१. **मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**
२. **मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

# आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**प्रस्तावना :**

आपत्तीमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन महत्वाचे आहे. आपल्या देशात भूकंप, दुष्काळ, अवर्षण, दंगल, चक्रीवादळे, औद्योगिक अपघात, सुनामी लाटा, आग या आपत्तींची वारंवारता वाढली आहे. यासाठी जनजागृती करण्याचे काम आवश्यक आहे. हा विचार करुन गोंडवाना विद्यापीठाने आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्याचे निश्चित केले आहे.

**उद्दिष्टे :**

१) विविध आपत्तींचे आकलन विद्यार्थ्यांना करून देणे.
२) आपत्ती टाळण्यासाठी माहितीचे विविध स्त्रात विद्यार्थ्यांना माहिती करून देणे.
३) अटळ आपत्तींना सामोरे जाण्याची तयारी करणे.
४) आपत्तीनंतर बचाव कार्य व मदत कार्य वेगाने व सूत्रबध्दवणे करण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यामध्ये निर्माण करणे याकरिता तज्ज्ञांकरवी विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे
५) आपत्ती व्यवस्थापनांतून सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यामध्ये निमार्ण करणे.
६) आपत्ती येण्यापूर्वी त्या येऊ नयेत म्हणून पूर्वतयारीबाबत विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे.
७) महाविद्यालयीन स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्ष करणे.
८) आपत्ती व्यवस्थापन कायद्यांची व नियमांची माहिती महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना करून देणे.
९) आपत्तींच्या प्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून स्वयंस्फूर्तीने सहभाग घेणे.
१०)आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनास योग्य ते सहकार्य करणे.

**योजनेसाठी पात्रता :**


आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण ही योजना गोंडवाना विद्यापीठाशी संलग्र असलेल्या सर्व महाविद्यालयांमधून उच्चशिक्षण घेणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांसाठी आहे.

**योजनेसाठी अनुदान :**

सदर योजनेअंतर्गत ४ ते ५ महाविद्यालयांचा गट करून एकत्रित १०० विद्यार्थ्यांचे दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करावयाचे असल्याने ज्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी या शिबिराचे आयोजन करण्यात येईल, त्या आयोजक महाविद्यालयाला विद्यापीठाकडून रु. १५,०००/— अर्थसहाय्य देण्यात येईल.

सदर अनुदानातून खालीलप्रमाणे खर्चास मान्यता देण्यात येईल :

| | |
|---|---|
| १. आयोजन खर्च ( चहा, नाष्टा, भोजन, साधनसामग्री इ.) | रु. १०,०००/— |
| २. तज्ज्ञ व्यक्तींचे मानधन : | रु. ३,०००/— |
| ३. आकस्मिक व इतर खर्च यंत्रे / साहित्य व वाहतुक : | रु. २,०००/— |
| एकूण : | रु. १५,०००/— |



**प्रस्ताव दाखल करण्याची पध्दत :**

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी ४ ते ५ महाविद्यालयांचा गट इच्छुक आयोजक महाविद्यालय तयार करेल किंवा संचालक विद्यार्थी कल्याण एका आयोजक महाविद्यालयाची निवड करतील. निवड झालेल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याने कृतिसत्रासाठी प्रस्ताव दाखल करावयाचा आहे. याकरिता आवश्यक असलेला विहित नमुन्यातील अर्ज सोबत जोडला आहे. तो पूर्णपणे भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह मा. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कार्यालयाकडे २५ ऑगस्ट पूर्वी पाठवावा. निर्धारित तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाचा मान्यतेसाठी विचार केला जाणार नाही.

**योजनेची कार्यवाही:**

सदर योजना विद्यार्थी कल्याण विभागाने ठरवून दिलेल्या ४ ते ५ महाविद्यालयांच्या समूहाने एकत्रितरीत्या राबवायची आहे. याकरिता संबंधित महाविद्यालयाच्या विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याने संचालक विद्यार्थी कल्याण यांचेशी विचारविनिमय करून कार्यक्रमाचे नियोजन करावे. गटातील प्रत्येक महाविद्यालयाच्या २० विद्यार्थी— विद्यार्थीनींची या कृतिसत्रासाठी निवड करताना प्रथम वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांनाच प्राधान्य द्यावे. प्रत्येक महाविद्यालयाच्या २० याप्रमाणे ८० ते १०० विद्यार्थी विद्यार्थीनीचे दोन दिवसीय प्रशिक्षण कृतिसत्र गटातील विद्यार्थ्यांनी निश्चित केलेल्या महाविद्यालयात आयोजित करावे.

कृतिसत्रात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवास खर्च त्यांच्याच महाविद्यालयाने करावयाचा आहे. प्रशिक्षणासाठी तज्ज्ञांना निमंत्रित करण्यात यावे. व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या स्थानिक पातळीवरील तज्ज्ञांना प्राधान्य देण्यात यावे. जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून याबाबत आवश्यक ते मार्गदर्शन घ्यावे. प्रशिक्षण कार्यक्रम संपूर्ण दोन दिवसांचा स. १० ते सांय. ५ या वेळेत घेण्यात यावा.

**या कृतिसत्रासाठी खालील विषयांच्या प्रशिक्षणाचा समावेश असावा :**

१) आपत्ती व आपत्कालीन व्यवस्थापन.
२) भूकंप व त्सुनामी.
३) वीज आणि वादळे.
४) पुर आणि आग.
५) औद्योगिक व रासायनिक दुर्घटना.
६) दुष्काळ.
७) प्रथमोपचार.
८) आपत्तिपश्चात तणाव व्यवस्थापन.

वरीलपैकी किमान चार विषयांच्या प्रशिक्षणाचा अंतर्भाव कृतिसत्रात असावा. प्रशिक्षण तज्ज्ञांमार्फत देण्यात यावे व प्रशिक्षण देताना विद्यार्थ्यांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. प्रशिक्षण कार्यक्रम संपल्यानंतर त्याचा विस्तृत अहवाल फोटोसह तयार करावा. कृतिसत्रात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयनिहाय हजेरी — पत्रक ठेवण्यात यावे.

**अहवाल व हिशेब सादर करण्याची पध्दत :**

अ) दरवर्षी फेब्रुवारी अखेरपर्यंत या योजनेअंतर्गत कृतिसत्र आयोजित करावे.
ब) कृतिसत्रात सहभाग घेतलेल्या महाविद्यालयांची यादी.
क) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कृतिसत्रात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे मुळ हजेरी—पत्रक (झेरॉक्स नको) सादर करावे.
ड) हिशेब कोणत्याही परिस्थितीत त्या त्या वर्षाच्या १० मार्चपर्यंत पाठवावेत.

**हिशेब सादर करताना पुढील कागदपत्रांची पूर्तता करावी:**

१) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेचे मान्यतापत्र.
२) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेचा अहवाल (फोटोंसह).
३) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेसाठी झालेल्या खर्चाच्या मूळ पावत्या (झेरॉक्स नको).
४) हिशेब सादर करताना विवरणपत्रावर प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी (S.W.O.) यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.
५) दोन दिवसांच्या कृतिसत्राची तपशीलवार कार्यक्रमपत्रिका.

नियमावलीत योग्य ते बदल करण्याचे अधिकार मा. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडे असतील.

**डॉ. ईश्वर एस. मोहुर्ले**
**संचालक विद्यार्थी कल्याण**

**डॉ. विनायक एस. ईरपाते**
**कुलसचिव**

**डॉ. मुरलीधर जी. चांदेकर**
**कुलगुरु व अध्यक्ष**

## विद्यार्थी कल्याण विभाग, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
## महाविद्यालयीन स्तरावरील आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, २० —२० साठी प्रस्ताव

१) महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ..................................................................................................
२) महाविद्यालय स्थापनेचे वर्ष : ..................................................................................................
३) प्राचार्यांचे नांव : ..................................................................................................
४) विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याचे नांव व मोबाईल क्र. : ..................................................................
५) महाविद्यालयातील एकूण प्राध्यापकांची संख्या : ..................................................................
६) महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी संख्या : ..................................................................
७) महाविद्यालयातील एकूण शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या : ..................................................
८) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेअंतर्गत गटातील अन्य महाविद्यालयांची माहिती:..................

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव व पत्ता | विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याचे नांव |
|---|---|---|
| १. | .................................... | .................................... |
| २. | .................................... | .................................... |
| ३. | .................................... | .................................... |
| ४. | .................................... | .................................... |
| ५. | .................................... | .................................... |

९. सन २० —२० या शैक्षणिक वर्षात सदर योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा संभाव्य खर्चाचा आढावा.

१)

२)

१०. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून द्यावयाच्या प्रशिक्षणासाठी स्थानिक प्रशिक्षक उपलब्ध आहेत काय? होय / नाही

११. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कृतिसत्रासाठी महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेल्या सुविधा:

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

| विद्यार्थी कल्याण अधिकारी (S.W.O.) | महाविद्यालयाची | प्राचार्य |
|---|---|---|
| स्वाक्षरी व शिक्का | शिक्का | स्वाक्षरी व शिक्का |